**ठळक बातम्या**

- राज्यातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर / येत्या २ डिसेंबरला मतदान, ३ डिसेंबरला मतमोजणी

- महात्मा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत २ हजार ३९९ आजारांचा समावेश करायला राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

- विश्वचषक विजेत्या भारतीय महिला क्रिकेट संघातल्या महाराष्ट्रातल्या खेळाडूंना रोख पुरस्कार देण्याचा राज्य सरकारचा निर्णय

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ५१९ अंकांची घसरण

**आणि**

- आयसीसीनं जाहीर केलेल्या महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या सर्वोत्कृष्ट संघात स्मृती मानधना, जेमिमा रॉड्रिग्स आणि दीप्ती शर्मा यांना स्थान

**<><><><><>**

राज्यातल्या २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींसाठीचा निवडणूक कार्यक्रम आज राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला. यानुसार येत्या २ डिसेंबर रोजी मतदान होणार असून ३ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज मुंबईत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीसाठी १० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज भरता येणार असून १७ नोव्हेंबरला अर्ज भरण्याची अंतिम मुदत आहे. १८ नोव्हेंबरला उमेदवार अर्जांची छाननी केली जाईल, २१ नोव्हेंबरला अर्ज माघारी घेता येईल तसंच २६ नोव्हेंबरला उमेदवारांची अंतिम यादी जाहीर केली जाईल असं वाघमारे यांनी सांगितलं. या निवडणुकीत एकूण १ कोटी ७ लाख ३ हजार ५७६ मतदार ६ हजार ८५९ सदस्य आणि २८८ अध्यक्षांची निवड करतील.

ही निवडणूक ईव्हीएमद्वारेच होणार आहे, असं दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केलं. मतदार याद्यांमधल्या दुबार नावाबाबत निवडणूक आयोगाने दक्षता घेतली आहे, यासाठी एक टूल विकसित केल्याचं वाघमारे यांनी सांगितलं.

**- होल्ड - बाईट - वाघमारे - - (२९ सेकंद)**

दुबार नाव असलेल्या मतदाराने संपर्क केल्यानंतर प्रतिसाद दिला नाही तर त्याच्या नावापुढे सर्व मतदान केंद्रावर डबल स्टार म्हणून नोंद होईल. अशा मतदाराकडून आपण दुसऱ्या मतदान केंद्रावर मतदान करणार नाही असं हमीपत्र लिहून घेतलं जाईल, असं दिनेश वाघमारे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

निवडणूक आयोगानं आजपासून एसआयआरचा म्हणजे मतदार याद्यांच्या विशेष पुनरिक्षण मोहिमेचा दुसरा टप्पा सुरू केला. नऊ राज्यं आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मिळून एकंदर ५१ कोटी मतदारांची पडताळणी या मोहिमेत केली जाणार आहे. या मतदारांची पडताळणी करून ७ फेब्रुवारी २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. दुसऱ्या टप्प्यात छत्तीसगड, गोवा, गुजरात, केरळ, मध्य प्रदेश, पुदुच्चेरी, राजस्थान, तमिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, अंदमान आणि निकोबार तसंच लक्षद्वीपमध्ये मतदारांची पडताळणी केली जाणार आहे.

**<><><><><>**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या दोन्ही योजनांतर्गत उपचारांच्या यादीत सुधारणा करायला राज्य मंत्रीमंडळानं आज मान्यता दिली. त्यानुसार आता या योजनेत २ हजार ३९९ आजारांचा समावेश केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुंबईत बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली. आयुष्मान कार्ड तयार करणाऱ्या आणि वितरीत करणाऱ्या आघाडीच्या फळीतल्या

कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ करायला, तसंच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचं नियमित पदावर समायोजन करण्याच्या निर्णयात दुरुस्ती करायलाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सुविधांचं विकेंद्रीकरण करण्याच्या उद्देशानं शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्याचा निर्णयही या बैठकीत झाला. भारतीय रिझर्व्ह बँकेनं परवाना नाकारल्यानं महा आर्क लिमिटेड ही राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनी बंद करायलाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली आहे.

याशिवाय विरार ते अलिबाग बहुउद्देशिय वाहतूक मार्गिका प्रकल्पाच्या कर्जाला शासन हमी द्यायला मान्यता, सोलापूर जिल्ह्यात कुंभारी इथं असंघटित कामगारांसाठी उभारल्या जाणाऱ्या ३० हजार घरांच्या गृहप्रकल्पाला विविध करांमधून सवलत, रुतेग बहादूर साहिब जी यांच्या साडेतीनशेव्या शहीदी समागम शताब्दी कार्यक्रमाकरता निधी, परशुराम आर्थिक विकास महामंडळ, वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ आणि श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांनाही मंत्रिमंडळानं मंजुरी दिली.

**<><><><><>**

आयसीसी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचं विजेतेपद मिळवणाऱ्या भारतीय महिला क्रिकेट संघाच्या विजयात योगदान देणाऱ्या महाराष्ट्राच्या खेळाडू स्मृती मंधाना, जेमिमा रॉड्रीग्ज आणि राधा यादव या तिघींचा रोख पुरस्कार देऊन सन्मान करायचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

**<><><><><>**

उत्पन्नाचा नवा स्रोत निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्य परिवहन महामंडळ राज्यभरात आपल्या मालकीच्या २५०पेक्षा जास्त जागांवर इंधन विक्री सुरू करणार असल्याची माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात आज झालेल्या बैठकीत ते बोलत होते. या ठिकाणी व्यावसायिक तत्वावर पेट्रोल, डीझेलबरोबरच सीएनजी तसंच इलेक्ट्रिक चार्जिंग उपलब्ध असतील.

दरम्यान, एसटीच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीची थकबाकीची रक्कम देण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. एस टी महामंडळानं आज प्रसिद्ध केलेल्या निवेदनात ही माहिती देण्यात आली आहे. कर्मचाऱ्यांना २०२० ते २०२४ या कालावधीतील वेतनवाढीची थकबाकी रकमेनुसार पाच ते ४८ हप्त्यांमध्ये प्रदान केली जाणार आहे.

**<><><><><>**

मार्ड या रहिवासी डॉक्टरांच्या संघटनेनं पुकारलेल्या राज्यव्यापी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आज वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत डॉक्टरांचे प्रश्न, मागण्या यावर चर्चा झाली. राज्य शासन या मागण्यांवर गांभीर्यानं विचार करत असून पुढील पावलं तातडीनं उचलली जात असल्याचं त्यांनी सांगितलं. मुख्यमंत्र्यांबरोबर

'मार्ड'च्या मागण्यांवर लवकरच चर्चा होणार असल्याची माहिती दिली. आंदोलनामुळे रुग्णसेवेत अडथळे येऊ नयेत म्हणून डॉक्टरांनी संप मागे घ्यावा, असं आवाहन मुश्रीफ यांनी केलं.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये आज दिवसअखेर ५१९ अंकांची घसरण झाली आणि तो ८३ हजार ४५९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १६६ अंकांची घसरण नोंदवत २५ हजार ५९८ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

आय सी सी अर्थात आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं नुकत्याच झालेल्या महिला क्रिकेट विश्वचषक स्पर्धेचा त्यांचा सर्वोत्कृष्ट संघ आज जाहीर केला. या संघात विश्वचषक विजेत्या भारताच्या संघातल्या स्मृती मानधना, जेमिमा रॉड्रिग्स आणि दीप्ती शर्मा या तीन खेळाडूंना स्थान मिळालं आहे. स्मृती हीनं स्पर्धेत पन्नास पेक्षा जास्त सरासरीनं ४३४ धावा केल्या, तर जेमिमाची ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यातली शतकी खेळी निर्णायक ठरली होती. स्पर्धेची सर्वोत्तम खेळाडू ठरलेल्या दीप्ती शर्मा हिनं २१५ धावा आणि २२ बळींसह अष्टपैलू कामगिरी नोंदवली होती.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे आयसीसीच्या एकदिवसीय सामन्यांच्या क्रमवारीत भारताच्या जेमिमा रॉड्रिग्जने पहिल्या दहा फलंदाजात स्थान मिळवलं आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या उपांत्य सामन्यात केलेल्या शतकी खेळीमुळे तिच्या मानांकनात सुधारणा झाली आहे. स्मृती मानधना मात्र अव्वल स्थानावरुन दुसऱ्या स्थानावर घसरली असून सर्वोत्कृष्ट फलंदाजाचं स्थान दक्षिण आफ्रिकेची कर्णधार

लॉरा वोल्व्हार्टला मिळालं आहे. दीप्ती शर्माला अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत चौथं स्थान मिळालं आहे.भारतीय संघ चौथ्या स्थानावर आहे.

<><><><><>

नाशिकमधे सुरू असलेल्या रणजी क्रिकेट करंडक स्पर्धेतला महाराष्ट्र आणि सौराष्ट्र यांच्यातला सामना आज पावसाच्या व्यत्ययामुळे अनिर्णित राहिला. सामना थांबला तेव्हा महाराष्ट्राच्या दहा षटकांत १ बाद ५५ धावा झाल्या होत्या. त्याआधी सौराष्ट्रने आपला पहिला डाव पाच बाद ३९४ धावांवर घोषित केला. महाराष्ट्राकडून मुकेश चौधरीने दोन तर प्रदीप दाढे, विकी ओस्तवाल आणि जलज सक्सेना यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. महाराष्ट्राने एक बाद ५५ धावा केल्या. मात्र पावसामुळे नियमित वेळेच्या आधीच चहापानासाठी विश्रांती घेण्यात आली. त्यानंतरही पाऊस न थांबल्याने शेवटच्या दोन तासांत निर्णयाची शक्यता नसल्याने सामना थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला. हार्विक देसाईला १३२ धावांच्या खेळीसाठी सामनावीर म्हणून घोषित करण्यात आलं. तर नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे सामनाधिकारी, दोन्ही पंच आणि दोन्ही संघांच्या कर्णधारांना स्मरण चिन्ह देऊन गौरवण्यात आलं.

<><><><><>

शीख धर्मगुरू गुरू नानक यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. गुरु नानक यांचे आदर्श आणि मूल्यांचा स्वीकार करून चांगला समाज निर्माण करण्यासाठी प्रेरित करणारा हा दिवस असल्याचं मूर्मू आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाल्या आहेत.

<><><><><>

प्रसिद्ध उद्योगपती आणि हिंदुजा उद्योगसमूहाचे अध्यक्ष गोपीचंद हिंदुजा यांचं आज लंडनमधे निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. ब्रिटनमधल्या सर्वात श्रीमंत

व्यक्तिंमधे त्यांचा समावेश होता. मुंबईत हिंदुजा उद्योगसमूहातून त्यांनी कारकिर्दीला प्रारंभ केला होता. गेली दोन वर्षं त्यांच्याकडे हिंदुजा समूहाचं अध्यक्षपद होतं.

**<><><><>**

राज्यात होणाऱ्या नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांसाठी महायुती सज्ज असल्याचं मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितलं. महाजन यांच्या हस्ते आज नंदुरबार जिल्हा भाजपा कार्यालयाच्या नव्या इमारतीचं भूमिपूजन  झालं त्यावेळी ते बोलत होते. मतदार यांद्यामधला घोळ म्हणजे विरोधकांचा खोटं नेरेटीव्ह सेट करण्याचा प्रयत्न आहे, अशी टीका त्यांनी केली.

**<><><><>**

मुंबई युवक काँग्रेसच्या नवनियुक्त अध्यक्ष झीनत शबरीन आणि पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा मुंबईतल्या यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये झाला. या कार्यक्रमाला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, भारतीय युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष उदय भानू चिब उपस्थित होते.

**<><><><>**

गेल्या २४ तासात कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात राज्याच्या चारही विभागांमध्ये तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. तर विदर्भात हवामान कोरडं राहण्याची शक्यता वर्तवली आहे.

**//<><><><><>//**